आहे. तसेच मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या वापरात असलेल्या खाते वाहनेही दोन्ही गटांत समाविष्ट करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे विम्याची तरतूद लक्षात घेता या प्रकरणी सर्व रा. प. कार्यालयांनी या विम्यात समाविष्ट वाहनांना अपघात झाल्यास त्याबाबत तातडीने पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

आपल्या विभागाच्या मध्यवर्ती कार्यालयांच्या खाते वाहनास नुकसान, अपघात झाल्याची दुर्घटना घडल्यास किंवा त्याची/ त्यातील एखाद्या भागाची चोरी झाल्यास आपल्या नजीकच्या, आपल्या कार्यालयास झालेल्या असलेल्या किंवा नॅशनल इन्श्युरन्स कंपनीच्या यादीनुसार आपल्या सर्वात जवळ असणाऱ्या नॅशनल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेडच्या कार्यालयाशी ताबडतोब प्रत्यक्ष/ दूरध्वनी/ पत्र याद्वारे संपर्क साधून त्यांना दुर्घटनेची प्राथमिक माहिती द्यावी आणि पाठोपाठ तपशीलवार माहितीही कळवावी व तशी कार्यवाही केल्याचे या कार्यालयास कळवावे.

सर्व खाते वाहनांच्या विम्याची प्रमाणपत्रे मध्यवर्ती कार्यालयात कर्मचारीवर्ग खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहेत. आपल्याला या विमा पत्रातील तरतुदींची माहिती असावी म्हणून त्याची व त्यासोबतच्या कागदपत्रांची प्रत अवलोकनार्थ सोबत पाठविली आहे. त्यातील तरतुदीनुसार प्रत्येक वेळी यथोचित कार्यवाही करावी. विशेषत: "अपघाती हानी" या प्रकरणातील परिच्छेद ७ मधील तरतुदीप्रमाणे लायसन व नोंदणी प्रमाणपत्र [ आर. सी.] नोंद वही बाबत दक्षता घ्यावी.

आपल्याकडील एखादे वाहन निकामी करण्यात आले असल्यास त्याची माहिती मध्यवर्ती वाहन संचास त्वरित कळवावी व त्याची प्रत सहाय्यक प्रशासकीय अधिकारी, नॅशनल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड, १६ वीर नरिमन रोड, २ रा मजला, मर्कंटाईल बँक चेंबर, १९ कावासजी पटेल स्ट्रीट, मुंबई- ४०० ०२३. यांच्याकडे पाठवावी.

कृपया परिपत्रकाची पोच द्यावी.

उप महा व्यवस्थापक [क. व औ. सं.]

प्रत सादर रवाना :-

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार/ मुख्य लेखा अधिकारी/ उप महा व्यवस्थापक [वाहतूक]/ उप महा व्यवस्थापक [यं. अ.]/ उप महा व्यवस्थापक [नियोजन] / उप महा व्यवस्थापक [भां. व ख.]/ मुख्य स्थापत्य अभियंता/ सचिव, महामंडळ/ मुख्य कामगार अधिकारी/ विधी सल्लागार/ मुख्य सांख्यिकी/ जनसंपर्क अधिकारी/अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी [सेवामंडळ]/मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी/ संयुक्त मुख्य वैद्यकीय अधिकारी/ निवासी लेखा परीक्षक अधिकारी.

उप महा व्यवस्थापक [क. व औ. सं.]